



Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे    अंक : ७८४. वा    सोमवार    दि. २७ मे २०२४    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये


# २३ कोटींच्या भ्रष्टाचारात तरी कारवाई होणार का?

## आधीच्या करोडो रुपयांच्या घोटाळ्यांप्रमाणे या नवीन घोटाळ्यातही तत्कालीन जिल्हाशल्य चिकित्सक व भांडारपाल यांनी केला सुपडा साफ ?

### ज्याच्या तोंडावरून माशी उडत नव्हती असे अधिकारी ज्यांनी करोडो रुपयांचा केला भ्रष्टाचार नाही इतक्या वर्षी दिली ढकार


**पोस्टमार्टम ११**

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा रुग्णालयात नुकताच उघडकीस आलेला २३ कोटी रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणी दोषींवर कारवाई होणार का? की इतर भ्रष्टाचारी प्रकरणांप्रमाणेच या प्रकरणातही चालढकल करून दोषींना वाचवण्याचा प्रयत्न होईल, असा प्रश्न सध्या अनेकजण उपस्थित करीत आहेत. ज्यांना-ज्यांना जिल्हा रुग्णालयात चाललेले भ्रष्टाचार, महाघोटाळे आणि या भ्रष्टाचारातील दोषींना वाचवण्याचे काम कसे केले जाते, याची माहिती आहे, त्यांना या प्रकरणाविषयी देखील शंका असल्याचे दिसून येत आहे. जिल्हा रुग्णालयात मॉड्यूलर ओटी व लेबर रूम उभारण्यासाठी २३ कोटी रुपये कंत्राटदाराला आगाऊन देण्यात आले होते. २०२२-२३ मध्ये हा प्रकार घडला होता. त्या वेळी अर्थातच कोरोना महामारीची लाट ओसरणीकडे होते. या स्थितीतही जिल्हा रुग्णालयाच्या आधुनिकीकरणासाठी या विकासकार्यास मंजुरी देण्यात आली. परंतु ही सर्व प्रक्रिया करताना कोणतेही नियम पाळण्यात आलेले नाहीत. २३ कोटी रुपयांचे हे काम टेंडर न काढताच कंत्राटदाराला देण्यात आले. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर २६ फेब्रुवारी २०२३ रोजी कंत्राटदाराला सक्तीची नोटीस देण्यात आली. मात्र, कंत्राटदारावर त्याचा कोणताही परिणाम झाला नसल्याची माहिती आहे. या प्रकरणी तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तडस व भांडारपाल बोथे यांनी कंत्राटदाराशी संगनमत करून हा भ्रष्टाचार केलेला आहे. जिल्हा रुग्णालयात तसे भ्रष्टाचार तर फार होतात आणि झालेलेही आहेत. कोरोना महामारीच्या काळात तर भ्रष्टाचाराने अक्षरशः शिखर गाठले होते. या भ्रष्टाचाराची रक्कम तब्बल २०० कोटींपर्यंत असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घोटाळ्या प्रकरणी थेट विधानसभेत लक्षवेधी बुलडाणा आमदार संजय गायकवाड यांनी उपस्थित केली होती. त्यावर सातत्याने चौकशी समित्या गठित करण्यात येत आहेत. कारवाई मात्र कोणावरही करण्यात आल्याचे दिसून येत नाही. याशिवाय देखील जिल्हा रुग्णालयात भ्रष्टाचाराची अनेक नवीन प्रकरणे उघडकीस आली. भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांनी केलेले घोटाळे, रोखपाल पी. के. माळी यांनी केलेले घोटाळे, विद्यमान रोखपाल लाकडे हे करीत असलेले घोटाळे, हे सर्व काही दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने जनतेसमोर आणले आहे. या एकाही प्रकरणात अद्याप साधी चौकशी देखील करण्यात आलेली नाही किंवा कोणावर म्हणावी तशी कठोर कारवाई देखील करण्यात आलेली नाही. जिल्हा रुग्णालयात जो काही भ्रष्टाचार होतो त्याची फक्त चौकशी केली जाते, कागदपत्रे जप्त केली जातात, अधिकारी येऊन मेजवान्या हाणून जातात, त्यानंतर चौकशीचे अहवाल बासनात गुंडाळले जातात, कोणावरही कारवाई होत नाही आणि

**करोडो रुपयांचे सामान्य रुग्णालयाशी निगडित असलेले कंत्राटदारांशी संगनमत करून वेगवेगळ्या विभागाचे खोटे व जास्तीचे कागदोपत्री दाखवून कोणी काढले बिले व चौकशी दरम्यान दिलेल्या अहवालात त्या चौकडीवर फोजदारी दाखल करण्याचे दिले होते आदेश कोणी तो अहवाल इतके वर्ष दाबून ठेवलेले होते ते तक्रारकर्त्यांनी पाठपुरावा करून मिळवले व विश्वास ठेवून प्रशासनाला कुंभकर्णी झोपेतून जाग करून त्या चौघांवर कारवाई व्हावी करीता सोपवले सिटी न्यूजकडे**

भ्रष्टाचारी अधिकारी-कर्मचारी पुन्हा एका नव्या भ्रष्टाचारासाठी सज्ज होतात, हा प्रकार या ठिकाणी सर्रास होतो आहे. त्यामुळेच असे बोलले जात आहे की, या २३ कोटी रुपयांच्या घोटाळ्याची अवस्था देखील आधीच्या घोटाळ्यांप्रमाणेच होऊ नये. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचारासंदर्भात भंडाफोड करीत आहे, वृत्तमालिका प्रकाशित करून सर्व भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणत आहे, परंतु जिल्हा रुग्णालयाचे प्रशासन, आरोग्य विभागाचे प्रशासन एव्हढे बेशरम आणि निर्लज्ज झालेले आहे की, त्यांना कशानेही काहीही फरक पडत नाही. जिल्हा रुग्णालय सध्या भ्रष्टाचाराचे कुरण बनले आहे. या कुरणात अनेक भ्रष्टाचारी जनावरं दिवसरात्र चरत असतात. वरिष्ठांपर्यंत या कुरणातील हिस्सा पोहोचतो. त्यामुळे कुठलीही चौकशी होते परंतु कारवाई होतच नाही. आता या २३ कोटी रुपयांच्या प्रकरणात देखील एक चौकशी समितीची स्थापना करण्यात आली आहे. अपेक्षा एव्हढीच आहे की, या समितीने




लवकरात लवकर चौकशी पूर्ण करून यासंदर्भातील अहवाल वरिष्ठांना पाठवावा व वरिष्ठांकडून दोषींवर तात्काळ कठोर कारवाई व्हावी. अन्यथा भ्रष्टाचाराच्या बाबतीत जिल्हा रुग्णालयाचे प्रशासन येरे माझ्या मागल्या या म्हणीप्रमाणेच काम करीत राहील, यात काही शंका नाही. जिल्हा रुग्णालय व आरोग्य विभागातील अधिकारी जरी भ्रष्टाचाराबाबत कुंभकर्णी झोपेत असले, तरी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन एक जागता प्रहरी या नात्याने या भ्रष्टाचारावर प्रहार सातत्याने करीत राहणार आहे, हे नक्की. **सामान्य रुग्णालय भ्रष्टाचार प्रकरणात अ... , कु... , बो. व अ.. या चौकडीचा समावेश असून यांच्यावर कारवाईचे दिलेले आहे आदेश**

**अजून बरेच काही पुढील भागात...**

---

## वादळी वाऱ्यामुळे स्वागत कमान कोसळली

**जनसंचलन/ मेहकर**

गेल्या काही दिवसांपासून वादळी वारा सुरू झाला आहे.उन्हाळा समाप्त होत आहे.आणि पावसाळा सुरू होतांना दिसून येत आहे.आणि या मध्ये अवकाळी पाउस वादळी वारा सुरू झाला आहे. दि २६ मे रोजी वादळी वारा आल्यामुळे मेहकर तालुक्यातीत टेंभुर्णी शिवारातील स्वागत कमान कोसळली आहे.त्यामुळे टेंभुर्णी ते



मेहकर रस्ता हा पूर्णपणे जाम झाला आहे.

## बिबट्याच्या हल्ल्यात गाय ठार...

**जनसचंलन/मोताळा**

गत वर्षापासून खैरा- फुली-कंडारी परिसरात बिबट्याचा मुक्त संचार असून यापूर्वीही या भागातील अनेक कुत्रे, गाई, वासरांची रात्री दरम्यान बिबट्याने शिकारी केल्या आहेत. यामध्ये २४ मे रोजी कंडारी खुर्दमधील गट क्रमांक ५० महिला शेतकरी नर्मदाबाई तोताराम मोताळकर यांच्या शेतातील २५ हजार रुपये किमतीची गाभण गाय बिबट्याने रात्री दरम्यान फस्त केली, ही घटना २६ मे रोजी उघडकीस आली. त्यावरून घटनेची माहिती मोताळा वनपरिक्षेत्र विभागाकडे दिली व गाईचे शवविच्छेदन जवळा बाजार पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. खराटे यांनी केले त्यावरून मोताळा वनपरिक्षेत्र विभागाचे वनपाल सपकाळ व कर्मचारी राठोड यांनी भेट दिली. सदर घटनेमुळे शेतकरी वर्गामध्ये भीतीचे



वातावरण निर्माण झाले आहे. झालेल्या घटनेमुळे महिला शेतकरी मोताळकर यांच्याकडून शासनाकडून नुकसान भरपाईची मागणी केली जात आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जळगाव जामोद, संग्रामपूर तालुक्यात दोन दिवसात १८०० ब्रास वाळू जप्त

## १६ लाखांचा महसूल झाला जमा...

**जनसंचलन/बुलढाणा**

अवैध वाळू विरोधात महसूल विभागाने सातत्याने कारवाई करत आहे. गेल्या दोन दिवसात जळगाव जामोद आणि संग्रामपूर तालुक्यात १८०० ब्रास वाळू जप्त आली असून १६ लाखांचा महसूल जमा करण्यात आला आहे. आज जळगाव जामोद तालुक्यातील गोळेगाव पांडे येथील पाच विविध ठिकाणी अवैध वाळूचे साठे आढळून आले. यात १४५० ब्रास वाळू जप्त करण्यात आली. या जप्त करण्यात आलेल्या वाळूचा लिलाव करून यात सुमारे १३ लाख रुपयांचा महसूल जमा करण्यात आला. यातील ४५० ब्रास करिता जाहिर लिलाव घेण्यात आला. यात ११०० रुपये प्रती ब्रासप्रमाणे सर्वाधिक बोलीधारकास वाळूसाठा मंजूर करण्यात आला. यातील पाचपैकी दोघांचे चलन काढण्यात आले. उर्वरित ३ जणांचे महाखनिज ॲपवर नोंदणी नसल्याने चलन काढता आले नसल्याने सदर कार्यवाही उद्या करण्यात येणार आहे. संग्रामपूर तालुक्यातील खिरोडा येथे चार ठिकाणी अवैध रेतीचे अंदाजे



३५० ब्रासचे साठे जप्त करण्यात आले. याबाबत सर्व शासकीय कंत्राटदारांना माहिती देण्यात आली. जप्त वाळू साठे घेण्याबाबत इच्छुकांकरिता जाहिरनामा काढण्यात आला. यात संग्रामपूर येथे दिवाणी न्यायालयाचे बांधकाम करणाऱ्या कंत्राटदार यांनी मागणी केल्याने सदर रेतीसाठा त्यांच्या सुपूर्द करण्यात आला. त्यांना येत्या ३ दिवसात पूर्ण रेतीसाठ्याची उचल करण्यास सांगितले आहे. त्यांना ३५० ब्रासचे चलन उपलब्ध करून देण्यात आले आहे. जिल्ह्यात विविध ठिकाणी अवैध रेतीचे साठे आढळून येत आहे. याबाबत जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनात उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि महसूल विभागाची चमू कारवाई करत आहे. गेल्या आठवडाभरापासून अवैध वाळू विरोधात सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. येत्या काळातही संपूर्ण जिल्हाभरात अवैध वाळू विरोधात कारवाई करण्यात येणार आहे. या कारवाईमुळे अवैध वाळूला चाप बसण्यास मदत मिळणार आहे, असे जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सांगितले.

# सतिफैल भागात निशुल्क योग प्राणायाम व लाठी काठी प्रशिक्षण शिबीरांला सुरुवात





**जनसंचलन/खामगाव**

स्थानिक सतिफैल येथे छत्रपती शिवाजी महाराज न. प. शाळा क्रं २ या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या अ.भा.मराठा महासंघ क्रीडा विभाग जिल्हा व पतंजली योग समिती खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिबीर दि.२५/५/२४ ते २९/५/२४ मे पर्यंत चालणाऱ्या शिबिराचे आज दिं २५ / ५ / २०२४ शनिवार रोजी सकाळी ५ वा उद्घाटन अखिल भा. म. महासंघ जिल्हाअध्यक्षा तथा वि. हिं. प प्रखंड संयोजिका श्रीमती अनिताताई तनपुरे, जिल्हा क्रीडा विभाग अध्यक्ष विकास भाऊ चव्हाण,पतंजली तालुका प्रभारी भिकाजी रेठेकर, राजु अवचार, यांच्या हस्ते करण्यात आले सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या ला व, मराठा महासंघाचे संस्थापक अण्णा साहेब पाटील,भारतमाता, यांच्या प्रतिमेला माल्याअर्पण करून मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली या प्रसंगी मान्यवरांचे पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी योग शिक्षक राजेंद्र सिंग राजपूत सर यांनी विद्यार्थ्यांना वेगवेगळे योग आसन दाखवुन मार्गदर्शन करुन विद्यार्थ्यांनकडुन आसन करवुन घेतली. विशेष उपस्थिती बौद्धिक विचार देण्याकरिता ॲड. सौं. अपर्णाताई देशमुख यांनी युवकांचे सामाजिक कर्तव्य या विषयावर मार्गदर्शन केले.या प्रसंगी संजय नळकांडे, आकाश खरपाडे,प्रसिद्धी प्रमुख देविदास शर्मा, मंगेश भोपळे, पांढरे, कऱ्हाळे, श्याम तोडेकर,सुनील मोटे, विशाल भवर, संजय शिंदे, श्याम निंबाळकर, विशाल रेठेकर,विशाल घोडके, ग्रंथपाल मिनाताई मापारी, आदींची प्रमुख उपस्थिती होती या प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना संजय नळकांडे यांच्या कडून खावु देण्यात आला.या शिबीराचा शेकडो विद्यार्थी व परिसरातील नागरिक लाभ घेत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका प्रभारी भिकाजी रेठेकर यांनी केले अशी माहिती आयोजन समितीचे प्रसिद्धी प्रमुख देविदास शर्मा यांनी दिली आहे तसेच संध्याकाळी ५-३० ते ६-३० वाजेपर्यंत लाठी काठी प्रशिक्षण होईल तरी जास्तीत जास्त मुला मुलींनी याचा लाभ घ्यावा

# वाढत्या तापमानाचा गुरांनाही बसतोय चांगलाच फटका...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात गत काही दिवसांपासून तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे माणसांबरोबर गुरांचेही हाल होत आहेत. वाढत्या उष्णतेमुळे जनावरांनाही उष्माघात होण्याचा धोका वाढला आहे. बुलढाणा तालुक्यात जवळपास ११ लाखांच्या आसपास पशुधन आहे. उन्हाच्या झळांनी पशुंनाही धोका निर्माण होतो. त्यामुळे पशुपालकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे. मे महिन्यात तापमान ४२ अंश सेल्सिअसच्या पुढे गेल्यास त्यांचा गायी, म्हशींच्या आरोग्यावर तसेच कार्यक्षमता, दूध उत्पादकतेवर परिणाम होतो. उन्हाळ्यामध्ये वाता-



वरणातील तापमानामुळे जनावरांच्या शरीराद्वारे वातावरणातील जास्त उष्णता शोषल्यामुळे किंवा शरीरातील उष्णता उत्सर्जित करण्याच्या प्रक्रियेमध्ये बाधा निर्माण झाल्यास किंवा शरीरामध्ये अतिरिक्त उष्णता निर्माण झाल्यास त्यांच्या शरीरात या वाढलेल्या तापमानामुळे ताण येतो. त्यांचे शारीरिक तापमान वाढते. जनावरांची तापमान नियंत्रण करण्याची शारीरिक क्षमता कमी पडल्यास दुष्परिणाम दिसून येतात.

# चालकाचे नियंत्रण सुटल्याने स्कार्पिओ पलटी!

## एक ठार, चार गंभीर, खामगाव तालुक्यातील घटना

**जनसंचलन/ खामगाव**

चालकाचे नियंत्रण सुटल्याने स्कार्पिओ पलटी होवून एक जण जागीच ठार,तर चार जण गंभीर जखमी झाल्याची घटना खामगाव तालुक्यात आज पहाटे उघडकीस आली आहे. स्कार्पिओ कार चालकाचे नियंत्रण सुटून, कार पलटी होऊन एक जण जागीच ठार, चार जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना खामगाव तालुक्यातील आंबेटाकळी ते बोरी - अडगाव रोडवर आज पहाटे २६ मे रोजी सहा वाजताच्या दरम्यान घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार एम एच ३३.ए सी. २३६६ ही स्कार्पिओ गाडी शेगावकडे जात होती.भरधाव वेगामुळे कारचालकाचे गाडीवरील अचानक नियंत्रण सुटल्याने गाडी




आंबेटाकळी ते बोरी - अडगाव रोडवर पलटी झाली आहे. स्थानिक नागरिकांना माहिती मिळताच या अपघातातील जखमींना खामगाव येथील सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले होते. या अपघातात देवराव रावजी भंडारकर (५५) रा. गडचिरोली हे जागीच ठार झाले आहेत. यासह गाडीमधील सौ कांता देवराव भंडारकर वय (५०), जयदेव नामदेव नाकाडू (४०), जयश्री राऊत (१६), समृद्धी कोमलवार (६) सर्व रा. तळेगाव ता. कुरखेड, जिल्हा - गडचिरोली हे चार जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना खामगाव येथील शासकीय सामान्य रुग्णालयातील डॉक्टरांनी प्रथमचार करून पुढील उपचारासाठी अकोला येथे रेफर केले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# अखेर निमगाव वायाळ रेती घाटात तलाठ्यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून जिवे मारण्यांचा प्रयत्न करणाऱ्या दोन आरोपींना अटक

**जनसंचलन/सिंदखेडराजा**

तालुक्यातील निमगाव वायाळ येथील खडकपूर्णा नदीपात्रात दोन महिन्यांपूर्वी अवैध रेती उत्खनन सुरू असल्याची गुप्त माहिती महसूल पथकाला मिळाली त्यानुसार बदकातील तलाठी यशवंत घरजाळे विष्णू थोरात यांच्या अंगावर ४० ते ४५ आरोपींनी ट्रॅक्टर अंगावर घालून जिवे मारण्यांचा प्रयत्न केला त्यातील दोन आरोपींना आज दिनांक २५ मे रोजी किनगाव राजा पोलिसांनी अटक केली आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की २६ मार्च रोजी सायंकाळी ६:३० वाजे दरम्यान निमगाव वायाळ येथील खडकपूर्णा नदीपात्रातून रेती उत्खनन होत असल्याची गुप्त माहिती मिळाल्याने पथकातील कर्मचारी यशवंत घरजाळे व विष्णू थोरात तलाठी नदीपात्रात रेती चोरी करणाऱ्या वर कार्यवाही करण्याकरिता गेले असता अंदाजे ४० ४५ इसम चार ट्रॅक्टर मध्ये रेती भरताना दिसले यावेळी मोबाईल मध्ये शूटिंग घेतली व चारही ट्रॅक्टर ताब्यात घेण्यासाठी सर्व ४० ते ४५ मजूर करून दिली पळून गेली परंतु थोड्याच वेळा आणि अंदाजे ४० ते ४५ मधून जप्त केलेल्या ट्रॅक्टर जवळ आले व त्यातील काही मजुरांच्या हातात रेती भरण्याची फावडे होते ट्रॅक्टर चालकांनी पथकातील कर्मचारी यशवंत घरजाळे व विष्णू यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केला तसेच ट्रॅक्टरचा पाठलाग केल्यास तुम्हाला जीवी मारू अशी धमकी देणाऱ्या ४० ते ४५ आरोपी विरूद्ध तहसिलदार सचिन जैस्वाल यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी ४० ते ४५ अज्ञात आरोपी विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता त्या पैकी आज किनगाव राजा स्टेशनचे ठाणेदार विनोद नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपी १ शेख अलीम शेखअसिफ वय ३१, आरोपी २, विनोद शामराव खरात वय ३९ राहणार डिग्रस बु ता देऊळगाव राजा या दोन आरोपींना अटक करण्यात आली असून न्यायालयात हजर केले असता त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली आहे पुढील तपास पोउपनी युवराज राठोड करीत आहे

# आईच्या रक्षाविसर्जनानंतर मुलाचा हृदयविकाराने मृत्य

**जनसंचलन/ निमगाव**



आईचे रक्षा विसर्जन केल्यानंतर संध्याकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मुलाचा मृत्यू झाल्याची घटना २४ मे रोजी संध्याकाळी गावातील दांडगे परिवारात घडली. निमगाव येथील रुखमाबाई तुकाराम दांडगे (९५) यांचे २२ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले होते. त्यांच्या रक्षा विसर्जनाचा कार्यक्रम २४ मे रोजी झाला. त्याच दिवशी संध्याकाळी त्यांचा मुलगा माजी सैनिक तुळशीराम तुकाराम दांडगे (६४) यांचाही तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. तीन दिवसात घरातील दोन ज्येष्ठ व्यक्तींचा मृत्यू दांडगे परिवारात झाला. तुळशीराम दांडगे हे माजी सैनिक होते. तसेच नांदुरा येथील आयटीआय येथे सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत होते. २४ मे रोजी संध्याकाळी हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांच्या मुलांनी त्यांना तत्काळ नांदुरा येथील रुग्णालयात उपचारासाठी नेले. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. २५ मे रोजी माजी सैनिक तुळशीराम तुकाराम दांडगे यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# मनीषा थुट्टे राऊत यांना पीएचडी प्रदान...

**जनसंचलन/बुलढाणा**



बुलडाणा येथील मनीषा थुट्टे यांना पी. एच . डी .पदवी मिळली आहे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथील मराठी विभागाअंतर्गत मनीषा थुट्टे राऊत यांनी आपले संशोधन पूर्ण केले. या करीता त्यांनी समकालीन मराठी कवितेतील स्त्रियांचा जीवन संघर्ष - एक चिकित्सक अभ्यास हा विषय निवडला होता . त्यांना प्रा .डॉ. अनिता प्रभातराव खंडागळे कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली (लिंबाजी) यांचे मार्गदर्शन लाभले. या संशोधनासाठी त्यांना सारथीची शिष्यवृत्ती ही प्राप्त झाली होती. विवाह पश्चात बारावी नंतरचे शिक्षण पूर्ण करून त्यांनी हे यश संपादन केले आहे . त्यामुळे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे. आपल्या यशाचे श्रेय त्या सासर - माहेरचा परिवार आप्त स्वकीय व सहकारी यांना देतात.

# देऊळगाव महीत भीषण पाणीटंचाई

**जनसंचलन/ देऊळगाव मही**



येथे गत काही दिवसांपासून भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. ग्रामस्थांना आठ दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे. दोन वर्षांपासून सुरू असलेल्या जल जीवन मिशन योजनेचे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे या योजनेचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी होत आहे. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. देऊळगाव मही येथे गत काही दिवसांपासून भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. पाणी प्रश्न कायमचा मिटवण्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत योजना मंजूर करण्यात आली आहे. या योजनेचे काम संथ गतीने सुरू असल्याने ग्रामस्थांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. जल जीवन मिशन योजनेचे काम वेळेच्या अपूर्ण करावे अन्यथा २७ मे रोजी जन आंदोलन उभारू असा इशारा सरपंच प्रतिनिधी उमेश शिंगणे, धर्मराज खिल्लारे, संदीप राऊत, आनंथा इंगळे, संजय खरात, यांच्यासह ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने दिला आहे.

# ५० फूट विहिरीत पडलेल्या अस्वलाला मिळाले जीवनदान

## देव्हारी गावाजवळ १० तास सुरू होते बचाव अभियान

**जनसंचलन/बुलढाणा**



देव्हारी गावाजवळ असलेल्या एका शेतातील विहिरीत एक अस्वल २४ मे रोजी सायंकाळी पडले. १० तासांच्या बचाव अभियानानंतर या अस्वलाला बाहेर काढण्यात आरएफओ चेतन राठोड व त्यांच्या पथकाला यश मिळाले,अस्वलासाठी पोषक वातावरण असल्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्यात मोठ्या प्रमाणात अस्वलांचे अधिवास आहे. या अभयारण्यातील देव्हारी गावाजवळ एका शेतातील कठडे नसलेल्या ५० फूट खोल विहिरीत अस्वल पडले होते. ही बाब काल शुक्रवारी सायंकाळी शेतकऱ्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तत्काळ वन्यजीव विभागाला माहिती दिली. वन्यजीव विभागाचे कर्मचारी तसेच प्रादेशिक वन विभागाची रेस्क्यू टीम तत्काळ घटनास्थळी दाखल झाली. परंतु, तोपर्यंत अंधार झाला होता. विहिरीत जवळपास १० फूट पाणी असल्याने अस्वलाला बेशुद्ध करून बाहेर काढणे अशक्य होते. त्यामुळे आरएफओ चेतन राठोड यांनी अस्वलाला फिजिकल रेस्क्यू करण्याचे आदेश कर्मचाऱ्यांना दिले. विहिरीत मोटर लावून पाणी उपसण्याचा प्रयत्न केला. परंतु, अस्वलाने पाइप फोडून टाकले. त्यानंतर विहिरीत पिंजरा टाकण्यात आला; पण अस्वल हुलकावणी देत होते. लाकडी शिडी तयार करून ती विहिरीत टाकली तरीही अस्वल बाहेर येत नव्हते. शेवटी दोरीची शिडी विहिरीत टाकण्यात आली आणि त्याच्या मदतीने शनिवारी सकाळी ५ वाजेच्या सुमारास अस्वल विहिरीतून सुखरूप बाहेर निघून जंगलाच्या दिशेने पळून गेले. ही बचाव मोहीम आरएफओ चेतन राठोड यांच्या मार्गदर्शनात वनपाल संजय राठोड, वनपाल समाधान मांटे, रेस्क्यू टीमचे संदीप मडावी, अमोल चव्हाण, वन्यजीव विभागाचे नीतेश गवई, राजेंद्र सूर्यवंशी, प्रवीण भांडे, समाधान गुगळे, गोरक्षसनाथ जगताप, संजीवनी खारोडे यांच्यासह वनमजूर यांनी पार पाडली.

# वर्क फ्रॉम होम ऐकलं होतं, वर्क फ्रॉम जेल पहिल्यांदाच पाहिलं- भाजपच्या बड्या नेत्याचा केजरीवालांवर हल्लाबोल

वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर निशाणा साधत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी रविवारी सांगितले की, त्यांनी घरातून काम करणे ऐकले आहे, परंतु तुरुंगातून काम करणे याबद्दल त्यांनी प्रथमच ऐकले. फतेहगढ साहिबमधील भारतीय जनता पक्षाचे उमेदवार गेझा राम वाल्मिकी यांच्या समर्थनार्थ खन्ना येथे निवडणूक रॅलीला संबोधित करताना सिंह म्हणाले, ङ्क्षआप येथे सत्तेत आहे. ती कोणत्या प्रकारचे काम करत आहे हे तुम्हाला जास्त सांगण्याची गरज नाही. कथित अबकारी धोरण घोटाळ्याशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात केजरीवाल यांच्या अटकेचा संदर्भ देत सिंग म्हणाले की दिल्लीतही आपचे सरकार आहे, परंतु दारू घोटाळ्यात आप नेत्याला तुरुंगात टाकण्यात आले.संरक्षण मंत्री म्हणाले की, कोणत्याही नेत्यावर आरोप झाले तर ते आरोप-ातून मुक्त होईपर्यंत पदाचा राजीनामा देण्याचे नैतिक धैर्य असले पाहिजे. ही नैतिकता असल्याचे ते म्हणाले. सिंह म्हणाले की, आप नेते केजरीवाल यांना दारू घोटाळ्यात तुरुंगात टाकण्यात आले आहे. त्यानंतरही मुख्यमंत्रीपदावर कायम राहणार असल्याचे ते सांगतात. तुरुंगातून काम करणार असल्याचे ते सांगतात. सर्वोच्च न्यायालयाने केजरीवाल यांना १ जूनपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केला असून त्यांना २ जून रोजी आत्मसमर्पण करून पुन्हा तुरुंगात जाण्याचे निर्देश दिले आहेत. लोकसभा निवडणुकीसाठी सात टप्प्यांत मतदान होत असून शेवटच्या टप्प्यातील मतदान १ जून रोजी होणार आहे.केजरीवालांवर हल्लाबोल करत सिंग यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांवर निशाणा साधला आणि म्हणाले की, मला कार्यालयातून काम करणे माहित आहे, मी घरून काम करण्याबद्दल ऐकले आहे, परंतु मी पहिल्यांदाच तुरुंगातून काम ऐकत आहे. अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखालील भ्रष्टाचाराविरोधातील आंदोलनानंतर आम आदमी पक्ष स्थापन केल्याबद्दल त्यांनी केजरीवाल यांच्यावर निशाणा साधला. सिंह म्हणाले की, केजरीवाल अण्णा हजारेंसोबत आंदोलन करत होते, तेव्हा हजारे यांनी त्यांना सांगितले होते की, हे आंदोलन काँग्रेसच्या भ्रष्टाचाराविरुद्ध असून, त्याचे यश राजकीय फायद्यासाठी वापरू नये आणि कोणताही राजकीय पक्ष काढू नये.ते म्हणाले की, पण केजरीवाल यांनी त्यांच्या गुरूचे ऐकले नाही आणि आम आदमी पार्टी (आप) स्थापन केली. केजरीवाल यांनी मुख्यमंत्री झालो तर कधीच सरकारी निवासस्थानी राहणार नाही, असे सांगितले होते, असा दावा सिंह यांनी केला. ते म्हणाले, पण नंतर त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या निव-ासस्थानाचे शीशमहालमध्ये रूपांतर केले आणि त्यावर जनतेचा करोडोचा पैसा खर्च केला. भाजपच्या दिग्गज नेत्याने केजरीवाल यांच्या निवासस्थानी आपच्या राज्यसभा सदस्य स्वाती मालीव-ाल यांच्यावर त्यांचे सहकारी बिभव कुमार यांनी केलेल्या कथित हल्ल्याचाही उल्लेख केला. या प्रकरणी कुमारला अटक करण्यात आली आहे.सिंग म्हणाले की, त्यांना (मालिवाल) खूप मारहाण झाली आणि आता ते (केजरीवाल) देशातील जनतेसमोर भाषण देत आहेत. ते म्हणाले की, मी इतका रागाने का बोलत आहे, असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. आई, बहीण ही कोणत्याही जातीची, समाजाची किंवा राजकीय संघटनेची असू शकते. आमच्यासाठी ती आई आहे, मुलगी आहे. सिंह म्हणाले की, महिलांचा आदर हा भारतीय संस्कृतीचा महत्वाचा भाग आहे. केजरीवाल यांनी १५ दिवस या मुद्द्यावर मौन बाळगल्याचा दावा संरक्षणमंत्र्यांनी केला. तुमच्या पक्षाच्या खासदाराला तुमच्या घरात मारहाण केली जाते आणि तुम्ही गप्प बसता. मला तुम्हाला विचारायचे आहे की अशा व्यक्तीला मुख्यमंत्री राहण्याचा अधिकार आहे का?



## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार युवक ठार

जनसंचलन/खामगाव

भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक देवून झालेल्या अप-घातात दुचकीस्वार युवक जागीच ठार झाल्याची घटना तालुक्यातील पिंप्री गवळी येथे शुक्रवारी दुपारी घडली. गोपाल हरिदास पोरे वय ३० वर्षे हा युवक शुक्रवारी दुपारी ३ वाजेदरम्यान दुचाकी क्र. एम. एच. २८ एके ९०६० ने खामगाव येथून घरी जात होता. दरम्यान तो हायवे ओलांडून जात असतांना वळण मार्गावर एका भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने त्याच्या दुचाकीला जबर धडक दिली. या अपघातात गोपाल पोरे हा जागीच ठार झाला. या घटनेने पोरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावात हळहळ व्यक्त होत आहे. याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी मर्ग दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.




## अडतमधून तुर लंपास करणाऱ्या महिलेविरोधात गुन्हा दाखल...

जनसंचलन/खामगाव

अडत दुकानात ठेवलेली २५ किलो तूर चोरीला गेली. ही घटना सीसी कॅमेऱ्यात कैद झाली. आरोपी महिलेची ओळख पटल्यानंतर शहर पोलिसांनी संबंधित महिलेविरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला. तक्रारीनुसार, विपीन बजाज ४९ यांचे स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अडत दुकान आहे. त्यांच्या दुकानात खरेदी केलेली तूर चोरीला गेल्याची घटना २४ मे रोजी दुपारी घडली. दुकानातील कामगाराने तूर चोरी गेल्याचा निरोप दिल्यानंतर सीसी कॅमेऱ्याची तपासणी केली असता, एका महिलेने तूर चोरून नेल्याचे उघडकीस आले. संशयित महिलेने चोरीची कबुली दिल्यानंतर तिच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

## दिव्य सेवा प्रकल्पाच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

### मनोरुग्णांना कुठल्याही स्वरूपातील दान द्यावे - राधेश्यामजी चांडक

जनसंचलन/बुलढाणा

दानधर्माची परंपरा ही शतकानुशतके जुनी आहे. परंतु समाजात दातृत्वशक्तीचा अभाव दिसतोय. दान हे सत्पात्री व गरज असणाऱ्यांना व्यक्तिंना दिले गेले पाहिजे. मग हे दान कुठल्याही स्वरूपातील असो, एखाद्याच्या कुवतीनुसार धान्य, कपडे, अन्नपदार्थ, पैसा आणि इतर अनेक वस्तू गरजूंना मूकपणे देऊन विसरणे याला दान म्हणतात. अशा दानाची खरी गरज दिव्य सेवा निव-ासी पुनर्वसन प्रकल्पातील मनोरुग्णांना असून, मदतीसाठी प्रत्येकानी पुढे यावे व नव्याने उद्घाटित झालेल्या कार्यालयाशी संपर्क करून सत्कार्य करावे,असे आवाहन बुलडाणा अर्बनचे सर्वेसर्वा राधेश्यामजी चांडक उर्फ भाईजी यांनी केले.

शनिवारी २५ मे रोजी तहसील चौकातील प्राईड कॉम्प्लेक्स मधील दिव्य सेवा निवासी प्रकल्पाच्या संपर्क कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी भाईजी यांच्यासह ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार माधवराव गरुड, एडवोकेट निलेश कोठारी, दिव्या फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अश-ोक काकडे, ज्योतीताई काकडे यांची



प्रमुख उपस्थिती होती. संध्याकाळच्या ५ वाजता दिव्यसेवा निवासी पुनर्वसन प्रकल्पाच्या जनसंपर्क कार्यालयाचे राधेश्यामजी चांडक यांच्या हस्ते फित कापून रीतसर उद्घाटन करण्यात आले. यावेळी चांडक( भाईजी) म्हणाले की, वरवंड येथील दिव्य सेवा निव-ासी पुनर्वसन प्रकल्प मनोरुग्णांचे पुनर्वसन करून त्यांना नवसंजीवनी देत आहे. या वेडसर, निराधार, मनोरुग्णांच्या सेवेत काकडे दांपत्यांनी स्वतःला झोकून दिले आहे. त्यांच्या या सेवाकार्याला आपणही थोडाफार हातभार लावल्यास निराधारांना आध-ार मिळू शकते. केवळ स्वतःपुरते न पाहता समाजातील दुःखीतांच्या जखमांवर फुंकर घालण्याची आज गरज आहे. दिव्या फाउंडेशन अंतर्गत सुरू असलेला दिव्य सेवा निवासी पुनर्वसन प्रकल्पात आतापर्यंत ३१६ मनोरुग्णांचे पुनर्वसन झाले आहे. अंधारात चाचपडणाऱ्या मनोयात्रींना प्रकाशवाट दाखविण्याचे काम अशोक काकडे व त्यांच्या पत्नी ज्योती काकडे ह्या करीत आहेत. सध्या प्रकल्पात शंभर मनोरुग्ण दाखल आहेत. त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी समाजाचा देखील हातभार आवश्यक आहे. दातृत्वाच्या भावनेतून प्रत्येकानी फुल् न फुलाची पाकळी म्हणून नव्याने उद्घाटित झालेल्या कार्यालयाशी संपर्क करून मदतीचा हात द्यावा, असे आवाहन राधेश्याम चांडक यांनी यावेळी केले आहे.